# मुंबई विद्यापीठ

गोपनीय

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२–२३/३४०

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२–२३ मधील**
**२३ फेब्रुवारी, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पंधरावी सभा गुरूवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. दिगंबर शिर्के ( प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. अजय भामरे (प्रभारी प्र–कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. शिवराम एस. गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७. | डॉ. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १०. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११. | प्रा. सुनिल भिरूड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य | उपस्थित |
| १२. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १३. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

SKS

➢ श्रध्दांजली

## शांताबाई कांबळे

मराठी साहित्यातील पहिल्या दलित स्त्री आत्मचरित्राच्या लेखिका शांताबाई कांबळे यांचे वृध्दापकाळाने दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या १०० वर्षाच्या होत्या.

## डॉ. दिलीप मालखेडे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे यांचे दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी कर्करोगाने निधन झाले. मृत्यू समयी ते ५६ वर्षाचे होते.

## प्रा.नारायण राजाध्यक्ष

मुबंईतील न्यू लॉ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य नारायण राजाध्यक्ष यांचे दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते.

## शांती भूषण

जेष्ठ विधिज्ञ आणि माजी केंद्रीय विधिमंत्री शांती भूषण यांचे दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ९७ वर्षाचे होते.

## ललिता लाजमी

प्रसिध्द चित्रकार ललिता लाजमी यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या ९० वर्षाच्या होत्या.

## अच्युतराव वैद्य

राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे ज्येष्ठ स्वंयसेवक अच्युतराव वैद्य यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ९४ वर्षाचे होते.

515

## शाहनवाज प्रधान

प्रसिध्द अभिनेते शाहनवाज प्रधान यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ५६ वर्षाचे होते.

## बेला बोस

ज्येष्ठ अभिनेत्री, नृत्यांगना बेला बोस यांचे अल्पशा आजाराने दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी निधन झाले.मृत्यू समयी त्या ७९ वर्षाच्या होत्या.

## डॉ. कनक रेळे

ज्येष्ठ शास्त्रीय नृत्यांगना, शास्त्रीय नृत्याच्या अभ्यासक आणि मुंबईतील प्रसिध्द नालंदानृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापिका, पद्मभूषण डॉ. कनक रेळे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २२फेब्रुवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या ८५ वर्षाच्या होत्या.

वरील सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | **दिनांक १६ जानेवारी आणि १० फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.** | **कार्यकारी प्राधिकरणे विभाग** |
| ठराव | दिनांक १६ जानेवारी आणि १० फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त सुधारणेसह मंजुर करण्यात आले. | |
| बाब क्र. २ | **शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादा पत्र प्राप्त संस्थांचे प्रस्ताव अनुपालन अहवालासह अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्याची बाब.** | महाविद्यालय संलग्नता आणि विकास विभाग |
| ठराव | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३)(घ) नुसार तसेच शासनपत्र क्र. एनजीसी २०२२/(५४/२२)/मशि–४, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्या साठी प्राप्त प्रस्तावांवर शासना तर्फे इरादापत्र देण्यात आले असून अंतिम मान्यतेसाठी काही त्रुटी असल्याकारणाने १० संस्थेचे प्रस्ताव नाकारण्यात आले होते. शासना तर्फे प्रात झालेल्या इरादापत्राची वैधता दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पर्यत वैध असल्या कारणाने नविन महाविद्यालयाच्या अंतिम मान्यते साठीचे नविन प्रस्ताव | |

शासनाने नमूद केलेल्या त्रुटी पुर्ततेसह तसेच शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील परिशिष्ट 'क' प्रमाणे १० संस्थेकडून विहित मुदतीत प्रस्ताव प्राप्त झाले होते.

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून प्रस्तावित नविन महाविद्यालये सुरु करण्या करिता इरादापत्र प्राप्त संस्थंचे प्रस्ताव अनुपालन अहवालासह अंतिम मान्यतेसाठी एकुण १० प्राप्त झालेले आहेत. समिती, अधिष्ठाता मंडळाचे निर्णय व मा. कुलगुरु महोदयांचे निर्णय मा. व्यवस्थापन परिषदेपुढे महाराष्ट्र अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ नुसार सादर करण्यात आले असता ४ अपात्र महाविद्यालयांचे व ६ पात्र महाविद्यालयाचे प्रस्ताव (परिशिष्ट–अ) सकारात्मक शिफारशीसह शासना कडे सादर करण्याची शिफारस करण्यात आली. तसेच असेही ठरले या महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य, शिक्षक व इतर सुविधा उपलब्ध झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.

तसेच अशीही नोंद घेण्यात आली की, मुंबई विद्यापीठा अंतर्गत एकुण ७० विधी महाविद्यालये आहेत परंतु केवळ मोजक्याच महाविद्यालयात पूर्णवेळ मान्यता प्राप्त प्राचार्य आहेत. इतर सर्व महाविद्यालयाला पूर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त शिक्षक उपलब्ध नाहीत. त्यामुळे विद्यापीठाच्या विधी परिक्षांचे निकाल विहित मुदतीत जाहिर करण्यास विलंब होतो.

सदर बाबी वर सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चे अंती असे ठरले की, मुंबई विद्यापीठ अंर्तगत मोठया संख्येत विधी महाविद्यालये सुरु झालेली मान्यताप्राप्त आहेत. परंतु ब-याच विधी महाविद्यालयात पुर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य व शिक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली नाही व इतर पायाभूत सुविधा नाहीत. त्यामुळे नविन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची शिफारस महाराष्ट्र शासनास करण्यात यावी असे ठरले.

तसेच सर्व विधी महाविद्यालयांत पायाभूत सुविधांची व पूर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य आणि मान्यताप्राप्त शिक्षकांची तपासणी करण्यासाठी एक उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती महाविद्यालयात असणा–या विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक, सुविधा व इतर बाबी तपासून दोन महिन्यात समितीचा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा. सदर उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.

515

| बाब क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रस्तावित नविन महाविद्यालये सुरू करण्याकरिता इरादापत्र प्राप्त होण्यासाठी इच्छुक संस्था/मंडळ/सोसायटी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता आणि विकास विभाग |
|---|---|---|
| ठराव | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ व उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. ७०/विशी–५ दिनांक ०७ जानेवारी, २०२३ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता विद्यापीठाच्या बृहत आराखडयास महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण व विकास आयोगाच्या मंजूरी नुसार विद्यापठाने क्र. संलग्नता/मान्यता/आयसीडी/२०२३–२४/०१, दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजीच्या जाहीरातीद्वारे प्रस्तावित नविन महाविद्यालयांचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आले असता. जाहीरातीच्या अनुषंगाने एकुण ५४ प्रस्तावित नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाले.<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार व शासन निर्णय क्र. एनजीसी/ २०१७/ (२९/१७)/मशि–४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ मधील निकषांनुसार सदर प्रस्तावित नविन महाविद्यालयांच्या दस्तऐवजांची छानणी व पुर्न: छानणी अनुक्रमे दिनांक २० जानेवारी, २०२३ व २७ जानेवारी, २०२३ रोजी छानणी समितीद्वारे करण्यात आली. छानणी समितीचा प्राप्त अहवाल अधिष्ठाता मंडळापुढे दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी मान्यतेकरिता सादर करण्यात आला होता. प्राप्त झालेल्या एकूण ५४ प्रस्तावांना अधिष्ठाता मंडळाने तपासून एकूण ५४ प्रस्तावांपैकी १५ प्रस्ताव पात्र व उर्वरीत ३९ अपात्र प्रस्ताव मा. कुलगुरू महोदयांच्या सुनावणीसाठी शिफारस करण्यात आले असता, ३९ प्रस्तावांपैकी २४ संस्थांचे प्रस्ताव अपात्र व १२ संस्थेचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात आले. तसेच तीन संस्थांचे प्रस्ताव व्यवस्थापन परषदेपुढे निर्णयासाठी सादर करण्याचे आदेश दिले. (१५,३९,४९)<br><br>सदर एकूण ५४ प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आले असता २६ प्रस्ताव अपात्र व २८ प्रस्तावित महाविद्यालयांचे पात्र प्रस्ताव (परिशिष्ट 'ब') सकारात्मक शिफारशीसह शासनाकडे सादर करण्याची शिफारस करण्यात यावी, असा ठराव करण्यात आला.<br><br>तसेच अशीही नोंद घेण्यात आली की, मुंबई विद्यापीठा अंतर्गत एकुण ७० विधी महाविद्यालये आहेत परंतु केवळ मोजक्याच महाविद्यालयात पूर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य आहेत. इतर सर्व महाविद्यालयाला पूर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त शिक्षक | |

516

| | | |
|---|---|---|
| | उपलब्ध नाहीत. त्यामुळे विद्यापीठाच्या विधी परिक्षांचे निकाल विहित मुदतीत जाहिर करण्यास विलंब होतो.<br><br>सदर बाबी वर सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चे अंती असे ठरले की, मुंबई विद्यापीठ अंर्तगत मोठया संख्येत विधी महाविद्यालये सुरु झालेली आहेत. परंतु ब-याच विधी महाविद्यालयात पुर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य व शिक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली नाही व इतर पायाभूत सुविधा नाहीत. त्यामुळे नविन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची शिफारस महाराष्ट्र शासनास करण्यात यावी असे ठरले.<br><br>तसेच सर्व विधी महाविद्यालयांत पायाभूत सुविधांची व पूर्णवेळ मान्यताप्राप्त प्राचार्य आणि मान्यताप्राप्त शिक्षकांची तपासणी करण्यासाठी एक उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती महाविद्यालयात असणा—या विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक, सुविधा व इतर बाबी तपासून दोन महिन्यात समितीचा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा. सदर उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| बाब क्र. ४ | **सोबत प्राचार्य, एक्सेलसीर एज्युकेशन सोसायटीचे, के. बी. कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स अॅन्ड एस सी कॉलेज ऑफ सायन्स फॉर वूमन, मिठ बंदर रोड, कोपरी, जि. ठाणे-४०० ६०३ या महाविद्यालयाचे पत्र क्र. K.B./185/2022, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी "के. बी. कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स अॅन्ड एस सी कॉलेज ऑफ सायन्स फॉर वूमन" च्या ऐवजी "के. बी. कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स फॉर वूमन" असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव.** | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, **"के.बी.कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स अॅन्ड एस.सी. कॉलेज ऑफ सायन्स फॉर वूमन"** च्या ऐवजी **" के.बी.कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स फॉर वूमन"** असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. तसेच नावात बदल करण्यासाठी संबंधित महाविद्यालयाने २५०००/- (पंचवीस हजार रूपये फक्त) एवढे शुल्क विद्यापीठात जमा करावे.<br>असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात नावात बदल करताना महाविद्यालयाकडून शुल्क आकारण्यात यावे, याकरिता नियमानुसार संलग्नता विभागाने प्रक्रिया करून शुल्क मंजुर करून घेण्यात यावे.<br>चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, महाविद्यालयाच्या संलग्नता शुल्क सुधारणा करण्याकरिता संलग्नता विभागाने नियमानुसार प्रक्रिया राबविण्यात येऊन संलग्नता शुल्कात सुधारणा करण्यात यावी. | |

515

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ५ | सोबत सोमय्या ट्रस्ट, विद्याविहार, मुंबई या ट्रस्टच्या संचलित १) के. जे. सोमय्या कला, वाणिज्य महाविद्यालय २) एस.के. सोमय्या कला, आणि विज्ञान महाविद्यालय आणि ३) के.जे. सोमय्या वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय या ३ महाविद्यालया विरोधात शैक्षणिक कोर्स मुंबई विद्यापीठाची पूर्व परवानगी न घेता मनमानी करीत बंद केले आहेत यांच्या तक्रारी बाबतचा प्राप्त अहवाल. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, सदर बाब विद्यापरिषदेच्या मान्यतेशिवाय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आलेली आहे. असल्यामुळे उपरोक्त बाब कलम १२१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रथम विद्यापरिषदेसमोर विचारार्थ ठेवण्यात यावी, तद्नंतर व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी. | |
| बाब क्र. ६ | तेरणा इंजिनिअरींग कॉलेज, नेरूळ, नवी मुंबई या महाविद्यालयाने B.Des.(Design)Sem I/II (CBCS) हा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू केल्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | विद्याविषयक प्राधीकरणे बैठका आणि सेवा |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, विद्यापरिषदेच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दा क्र. ३(N) च्या शिफारशीनुसार तेरणा आभियांत्रिकी महाविद्यालय, नेरूळ, नवी मुंबई या महाविद्यालयास B.Des.(Design)Sem I/II (CBCS) या नवीन अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ७४(४)नुसार कुलपतीच्या मान्यतेकरिता पाठविण्यात यावा.<br><br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या पुर्व परवानगी शिवाय महाविद्यालयाने अभ्यासक्रम सुरू केला याबाबत विद्यापरिषदेच्या निर्णयानुसार केलेली कार्यवाही महाविद्यालयाच्या खुलाशासहीत व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. | |
| बाब क्र. ७ | **Fixing of honorarium of Dr Rajendra Kankariya as expert to guide on the Statutes, Ordinances and Regulations in respect of NEP implementation Plan.** | विद्याविषयक प्राधीकरणे बैठका आणि सेवा |
| ठराव | It was resolved that Dr Rajendra Kankariya be given honorarium of Rs. 10,000/- (Rupees Ten Thousand Only) per visit for one year for this expert advise on statutes, ordinances and Regulations in respects of NEP implementation plan. | |

5105

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ८ | **शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिताचे विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखा (अभियांत्रिकी) अंतर्गत येणाऱ्या MCA and Pharmacy First Year,FE,DSE & ME First Year, MMS व B.Sc Nautical Science या अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था (Arrangement of terms) (परिशिष्ठानुसार) मंजुर करण्यात आली.** | विद्याविषयक प्राधीकरणे बैठका आणि सेवा |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिताचे विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान शाखा (अभियांत्रिकी) अंतर्गत येणाऱ्या MCA and Pharmacy First Year,FE,DSE & ME First Year, MMS व B.Sc Nautical Science या अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था (Arrangement of terms) (परिशिष्टानुसार) मंजुर करण्यात आली. | |
| बाब क्र. ९ | **शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँण्ड टेक्नॉलॉजी, आसनगाव या महाविद्यालयाने B.E.(Automation and Robotics) हा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरू केल्याबाबची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.** | विद्याविषयक प्राधीकरणे बैठका आणि सेवा |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, विद्यापरिषदेच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने पारीत झालेल्या मुद्दा क्र. १(N) च्या शिफारशीनुसार शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँण्ड टेक्नोलॉजी या महाविद्यालयाने B.E.(Automation and Robotics) (Sem - III & IV) या नवीन अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली व कलम ७४ (४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार कुलपतीच्या मान्यतेकरिता पाठविण्यात यावा.<br><br>तसेच असा ही ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या पुर्व परवानगी शिवाय महाविद्यालयाने अभ्यासक्रम सुरू केला याबाबत विद्यापरिषदेच्या निर्णयानुसार केलेली कार्यवाही महाविद्यालयाच्या खुलाशासहीत व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. | |
| बाब क्र. १० | **Approval of Minutes of Building and Works Committee dated 16th January, 2023 and to place item before Management Council.** | पा.सु.नि.अं.व दे. विभाग |
| ठराव | It was resoled that the minutes of Building and works committee meeting dated 16th January, 2023 were approved. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ११ | **मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील अभियांत्रिकी (IPEMD) विभागात इमारत व परिसरातील विविध कामे जसे की पावसाळयात टेरेस साफ करणे, इमारतींचे सांडपाण्याचे चोकप काढणे, इलेक्ट्रीक, प्लंबर, कारपेंटर यांना मदतनीस म्हणून मदत करणे, पावसाळयापूर्वी पूर्ण विद्यानगरीचे नाले साफसफाई करणे इ. कामाकरिता रोजंदारी तत्वावर रोजंदारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेबाबत.** | पा.सु.नि.अं.व दे. विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, सदर कामाकरिता रोजंदारी तत्वावर कमचाऱ्यांची नेमणूक करू नये. तसेच सदर कामाकरिता विद्यानगरी परिसरातील उपलब्ध मनुष्यबळ व मागील पाच वर्षाचा सविस्तर खर्चाच्या तपशिलासह सदर बाब पुढील व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी.<br><br>असाही ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील अभियांत्रिकी (IPEMD) विभागात इमारत व परिसरातील विविध कामे जसे की पावसाळयात टेरेस साफ करणे, इमारतींचे सांडपाण्याचे चोकप काढणे, इलेक्ट्रीक, प्लंबर, कारपेंटर यांना मदतनीस म्हणून मदत करणे, पावसाळयापूर्वी पूर्ण विद्यानगरीचे नाले साफसफाई करणे इ. कामाकरिता रोजंदारी तत्वावर रोजंदारी कर्मचाऱ्यांची नेमणूक पायाभूत सुविधा, नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभागामार्फत करण्यात येउ नये. | |
| बाब क्र. १२ | **सुरक्षा विभागातील श्री. किरण बाबुराव सोनावणे व श्री. अरूण रामु कांबळे, अस्थायी सुरक्षा रक्षक यांचे माहे जून-२०२२ पासून आजतागायतचे रोखून धरलेले वेतन अदा करण्याबाबत.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, सुरक्षा विभागातील श्री. किरण बाबुराव सोनावणे व श्री. अरूण रामु कांबळे, अस्थायी सुरक्षा रक्षक यांचे माहे जुन - २०२२ पासून आजता गायताचे रोखून धरलेले वेतन अदा करण्यात यावे. तसेच आस्थापना विभागाच्या परवानगी शिवाय सदर कमचाऱ्यांना कामावर रूजु कसे काय करून घेण्यात आले, याबद्दल सुरक्षा अधिकारी यांना खुलासा विचारण्यात यावा, असेही ठरले.<br>सुरक्षा विभाग किंवा इतर विभाग जे अस्थाई कर्मचाऱ्यांना परस्पर कामावर रूजु करून घेतात त्यांना त्याबाबत तात्काळ आस्थापना विभागतर्फे परिपत्रक काढून संबंधिताना कळवावे की, आस्थापना विभागाच्यामार्फत विद्यापीठ प्रशासनाच्या पुर्व परवानगी शिवाय कामावर घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पगार काढण्याची जबाबदारी विद्यापीठाची नसेल. त्यांची पूर्ण जबाबदारी संबंधीत विभाग प्रमुख किंवा संबंधित अधिकाऱ्यांची असेल. | |

5K5

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १३ | **मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या पदनामात अंशतः बदल करून सातव्या वेतन आयोगातील पदांशी जुळवून पदोन्नती देण्याबाबत मुंबई विद्यापीठ मुद्रणालय यांचे २४ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रातील मागणीनुसार सादर.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | सविस्तर चर्चाअंती असा ठराव करण्यात आला की, सदर बाब संपूर्ण माहितीसह उदा शासकीय मुद्रणालयाच्या पदनाम, त्याची पदे, शासनाशी संबंधित पदांची समकक्षता, सातव्या वेतन आयोगातील पदसाखळीत बदल करायचे अधिकार कोणत्या नियमानुसार विद्यापीठाच्या अखत्यारीत येतात, कर्मचा-यांचा संपुर्ण तपशिल, वेतनश्रेणी, ग्रेड-पे कामाची जबाबदारी इत्यादी शासन पदावर जाताना निवृत्ती वेतनावर होणारे परिणाम, विद्यापीठावर भविष्यात येणारा आर्थिक भार इत्यादी संपूर्ण माहितीसह सदर बाब पुन्हा व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. | |
| बाब क्र. १४ | **Item to be placed before the Management Council for constituting a committee to revise Rules, Regulations and Guidelines of the Vice-Chancellor Fund.** | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव | कुलगुरूंचा निधीबाबत सादर केलेली बाब अपूर्ण असल्यामुळे सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, खालील माहितीसह सदर बाब व्यवस्थापन परिषदेत पुन्हा सादर करावी:-<br><br>१) कुलगुरू निधीबाबत असलेले नियम/ मार्गदर्शिका.<br>२) मागील पाच वर्षात सदर फंडाअंतर्गत विद्यार्थ्यांकडे जमा झालेल्या निधी खर्च/खर्चाचा सविस्तर तपशिल.<br>३) मागील पाच वर्षात कुलगुरू निधी (रू. १ करोड) यावर येणारे व्याज व जमा निधी व खर्चाचा सविस्तर तपशिल. | |
| बाब क्र. १५ | **मुंबई क्रीकेट असोसिशन मार्फत मुंबई विद्यापीठ अधिकारी यांना एम. सी.ए. सभासदत्व मिळणेबाबत.** | विद्यापीठ क्रीडा संकुल |
| ठराव | सदर बाब विषय पत्रिकेवरून मागे घेण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १८ | **The TDS liability of Rs. 38,10,836/- out of which we have to pay Rs. 32,45,817/- immediately and for the balance we are revised / rectifying the TDS return of Financial Year 2008-09 o 2022-23, as may be applicable & amp: feasible.** | **Financial & Accounts Department** |
| ठराव | It was resolved that the TDS liability of Rs. 38,10,836/- out of which we have to pay Rs. 32,45,817/- immediately and for the balance revised / rectifying the TDS return of Financial Year 2008-09 to 2022-23, as may be applicable & amp: feasible were approved. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्था.उपकुलसचिव

कुलसचिव (प्र.)

प्र- कुलगुरू- (प्र.)

मा. कुलगुरू (प्र.)